# प्रकरण पाचवे

## वडार समाजातील कामगारांची कामाची परिस्थिती व समस्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण - पाचवे

# वडार समाजातील कामगारांची कामाची परिस्थिती व समस्या

## प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये नमुन्यामध्ये निवडलेल्या १00 उत्तरदात्यांच्याकडून माहिती संकलित करून कामगारांच्या कामाची परिस्थिती व कामगारांच्या समस्या याविषयीचे विश्लेषण केले आहे. या प्रकरणात दोन विभाग केले आहे. पहिल्या विभागात कामाचे स्वरूप, दगडाची खरेदी, जाते-पाटा-वरवंटा, यातून मिळणारा फायदा, दगड घडवायला लागणारे दिवस, आधुनिक उपकरणामुळे जाते-पाटा-वरवंटा यावर झालेला परिणाम, रोजची मजूरी, कामाचे तास, आठवड्याची सुट्टी, कंत्राटदाराकडून मिळणारी वागणूक, कामाबद्दलची समाधानता, कौटुंबिक गरजांची पूर्तता, समाजातील सामाजिक, आर्थिक दर्जा याविषयीचे विवेचन केले आहे. दुसऱ्या विभागात कामगारांच्या समस्या याविषयीचे विश्लेषण केलेले आहे.

## अ. विभाग पहिला

### ५.१ व्यवसायाचे स्वरूप :

उत्तरदात्यांच्या व्यवसायाच्या स्वरूपावरून केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ५.१ मध्ये सादर केलेले आहे.

**सारणी क्रमांक. ५.१**

**उत्तरदात्यांच्या व्यवसायाच्या स्वरूपानुसार केलेले वर्गीकरण**

| व्यवसायाचे स्वरूप | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| हंगामी | ५५ | ५५.0 |
| कायमस्वरूपी | ४५ | ४५.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ५.१ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य

(५५.0%) उत्तरदात्यांच्या व्यवसायाचे स्वरूप हंगामी असल्याचे दिसून येते. तर उर्वरित (४५.0%) उत्तरदात्यांच्या व्यवसायाचे स्वरूप कायमस्वरूपी असल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, वडार जमातीचा मुळ पारंपरिक व्यवसाय हा या वडार लोकांना बाराही महिने रोजगार मिळवून देऊ शकत नाही. म्हणजे या व्यवसायाला एकप्रकारचे हंगामी स्वरूप आज निर्माण झालेले आहे.

## ५.२ घरातील मंडळीची मदत :

नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुमच्या कामामध्ये घरातील सर्व मंडळी मदत करतात का? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, बहुतांश (७२.0%) उत्तरदात्यांच्या घरामधील सर्व मंडळी कामामध्ये मदत करत नाही. तर (२८.0%) उत्तरदात्यांच्या घरातील सर्व मंडळी कामामध्ये मदत करतात यावरून असे दिसून येते की, खणीमध्ये दगड फोडणारे, नोकरी करणारे, गवंडी काम, ठेकेदार, खुदाई काम यासारख्या कामामध्ये घरामधील सर्व मंडळीचा मदत करण्याचा प्रश्न येत नाही. परंतु जे जाती-पाटा-वरवंटा घडविण्याचा व्यवसाय किंवा किराणा माल दुकान चालवितात त्यांच्या कामामध्ये घरातील सर्व मंडळी मदत करत असल्याचे दिसून येतात.

## ५.३ दगडाची खरेदी :

नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना दगड घेताना किंवा दगड फोडताना दगडाची खरेदी कशी असते? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक.५.३ मध्ये दर्शविले आहे.

### सारणी क्रमांक ५.३

### उत्तरदात्यांचे दगडाच्या खरेदीनुसार केलेले वर्गीकरण

| दगडाची खरेदी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| दगडाची खरेदी | २ | २.0 |
| ब्रासवर | १४ | १४.0 |
| नगावर | १८ | १८.0 |
| लागू होत नाही | ६६ | ६६.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ५.३ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (६६.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी (१८.0%) उत्तरदाते जाते, पाटे, वरवंटा या वस्तू बनविण्यासाठी लागणाऱ्या दगडाची खरेदी नगावर करत असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल (१४.0%) उत्तरदाते खणीमध्ये दगड फोडताना ब्रॉसवर फोडला जात असल्याचे दिसून येते. उर्वरित (२.0%) उत्तरदाते खडी फोडण्याचे काम ट्रॉलीवर करत असल्याचे दिसून येतात.

## ५.४ दगड घडवायला किती दिवस :

प्रस्तुत नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुम्हांला एक दगड घडवायला किती दिवस लागतात? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, नमुन्यामध्ये निवडलेल्या १00 उत्तरदात्यांपैकी ८२.0% उत्तरदात्यांना लागू होत नाही. तर उर्वरित १८.0 % उत्तरदात्यांना एक दगड घडवायला एक दिवस लागत असल्याचे दिसून येते.

## ५.५ वस्तू विकून फायदा :

प्रस्तुत नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना दगड खरेदी करून ज्या वस्तू जाते-पाटे-वरवंटा व इतर वस्तू तयार करता त्या वस्तू विकून किती फायदा मिळतो ? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ५.५ मध्ये दर्शविले आहे.

## सारणी क्रमांक. ५.५

## उत्तरदात्यांना वस्तू विकून मिळणारा फायदा दर्शविणारा तक्ता

| जाते | उत्तरदात्यांची संख्या | पाटा | उत्तरदात्यांची संख्या | वरवंटा | उत्तरदात्यांची संख्या | खलबत्ता | उत्तरदात्यांची संख्या | इतर वस्तू (गिरणी पेढा, तुलसी कट्टा) | उत्तरदात्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रू.५१ ते १०० | ६ | रू.१ ते ३० | १ | रू.१ ते १५ | ६ | रू.१ ते ३० | ५ | रू.३०१ ते ५०० | २ |
| रू. १०१ ते २०० | ५ | रू.३१ ते ४० | २ | रू.१६ ते ३० | ७ | रू. ३१ ते ५० | ६ | लागू होत नाही | ९८ |
| काहीच फायदा नाही | ७ | रू.४१ ते ८० | ९ | काहीच फायदा नाही | ५ | रू.५१ पेक्षा अधिक | ३ | एकूण | १०० |
| लागू होत नाही | ८२ | काहीच फायदा नाही | ६ | लागू होत नाही | ८२ | काहीच फायदा नाही | ४ | | |
| एकूण | १०० | लागू होत नाही | ८२ | एकूण | १०० | लागू होत नाही | ८२ | | |
| | | एकूण | १०० | | | एकूण | १०० | | |

सारणी क्रमांक ५.५ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (८२.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी (७.0%) उत्तरदात्यांना दगड खरेदी करून घडवून जाते विकून त्यापाठीमागे काहीच फायदा होत नसल्याचे निदर्शनास येते. तर ६ उत्तरदात्यांना रू. ५१ ते १00 पर्यंत, ५ उत्तरदात्यांना रू. १0१ ते २00 पर्यंत एका जात्यापाठीमागे फायदा होत असल्याचे दिसून येते.

एका पाट्यामागे किती पैसे मिळतात उत्तरदात्यांच्या उत्तरदाखल (६.0%) उत्तरदात्यांना काहीच पैसे किंवा फायदा होत नसल्याचे मत नोंदवितात. तर ९ उत्तरदात्यांना एका पाट्यामागे रू. ४१ ते ८0 पर्यंत, २ उत्तरदात्यांना रू ३१ ते ४0 पर्यंत, १ उत्तरदात्याला १ ते ३0 पर्यंत दगड खरेदी करून पाटा घडवून तो विकून फायदा होत असल्याचे दिसून येते.

वरवंटा तयार करून त्या वरवंट्यामागे विकून किती फायदा मिळतो याविषयी देखील माहिती संकलित केलेली होती. ७ उत्तरदात्यांना रू १६ ते ३0 पर्यंत फायदा मिळत असल्याचे दिसून येते. तर ६ उत्तरदात्यांना रू. १ ते ३0 पर्यंत उत्तरदात्यांना ५३ उत्तरदात्यांना काहीच फायदा होत नसल्याचे मत नोंदविले.

खलबत्ता पाठीमागे ६ उत्तरदात्यांना रू. ३१ ते ५0 पर्यंत फायदा होत असल्याचे दिसून येते. तर ५ उत्तरदात्यांना रू. १ ते ३0 पर्यंत ४ उत्तरदात्यांना, ५ उत्तरदात्यांना काहीच फायदा होत नसल्याचे सांगतात.

इतर वस्तू (तुलसी कट्टा, गिरणी पेढा, थडगं) या वस्तूंच्या पाठीमागे २ उत्तरदात्यांना रू. ३0१ ते ५00 पर्यंत फायदा होत असल्याचे दिसून येते. उर्वरित ९८ उत्तरदात्यांना लागू होत नाही.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, बहुतांशी (८२.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी (१८.0%) उत्तरदाते जाते-पाटे-वरवंटा घडविण्याचे काम करतात. जाते-पाटा-वरवंटा घडविण्याबरोबरच इतर वस्तू तयार करण्याचे प्रमाण (२.0%) नगण्य असल्याचे दिसून येते. कारण याला लागणारा दगड (पांढरा) हा महाग

असल्याचे दिसून येतो. तसेच इतर वस्तूंसाठी लागणारा दगड गोकाक कर्नाटकमधून आणावा लागतो. या वस्तूंसाठी भांडवल मोठ्या प्रमाणात गुंतवावे लागते. त्यातून त्या वस्तू खपतीलच याची शाश्वती नाही. जाते-पाटा-वरवंटा किंवा इतर वस्तूसाठी लागणारा दगड खरेदी करून त्या वस्तू घडवून विकल्या जातात त्यावेळी वडार समाजातील लोकांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे फायदा होत नसल्याचे दिसून येते.

## ५.६ वस्तूंची बाहेरगावी विक्री :

तयार केलेल्या वस्तू बाहेरगावी विकायला जाता का? त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ५.६ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ५.६**

वस्तूंची बाहेरगावी विक्री दर्शविणारा तक्ता

| बाहेरगावी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १८ | १८.0 |
| लागू होत नाही | ८२ | ८२.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्र.५.६ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (८२.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यापैकी (१८.0%) उत्तरदाते तयार केलेल्या वस्तू बाहेरगावी विकायला जात असल्याचे दिसून येते.

## ५.७ वस्तूच्या विक्रीची ठिकाणे :

नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तयार केलेल्या वस्तू बाहेरगावी विकायला जात असल्यास वस्तूच्या विक्रीची ठिकाणे कोणती? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी

उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, बहुतांशी उत्तरदाते गोवा, सावंतवाडी, मालवण, सिंधुदुर्ग (कोकण भाग) व कर्नाटकामध्ये तसेच कोल्हापूरच्या आसपासच्या खेड्यांमध्ये हळदी, बाचणी, कांडगाव, वाशी याठिकाणी तयार केलेल्या वस्तू विकायला जात असल्याचे दिसून येते. कोकण भागात किंवा कर्नाटकामध्ये वस्तू विकायला जातात त्यावेळी ते घराच्या बाहेर जवळपास ४ ते ५ महिने असतात. पावसाळ्यात आपल्या घरी परत येतात व पावसाळा संपल्यावर पुन्हा बाहेर पडतात, असे दिसून येते. आजही मोठ्या प्रमाणात वडार जमातीची पूर्वी पासूनची भटकंती ही संपुष्टात आलेली नसल्याचे स्पष्ट होते.

## ५.८ कच्च्या माल वस्तू ठेवण्यासाठी वेगळी खोली :

प्रस्तुत नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना आणलेला कच्चा माल किंवा तयार केलेल्या वस्तू ठेवण्यासाठी स्वत:ची वेगळी खोली आहे का? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, बहुसंख्य (८२.0%) कच्च्या उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी (१८.0%) उत्तरदात्यांना आणलेला माल किंवा तयार केलेल्या वस्तू ठेवण्यासाठी स्वत:ची वेगळी खोली नसल्याचे निदर्शनास येते.

## ५.९ मिक्सरचा परिणाम :

नमुन्यामध्ये निवडलेल्या १00 उत्तरदात्यांच्याकडून माहिती संकलित केली होती, संकलित केलेल्या माहितीच्या आधारे स्पष्ट होते की, बहुतांशी उत्तरदात्यांच्या मते मिक्सर बाजारात आल्यामुळे जाते-पाटा-वाटा-वरवंटा यावर परिणाम झाल्याचे दिसून येतो असे मत नोंदवतात. कारण मिक्सर बाजारात आल्यामुळे जाते-वरवंटा यांना पूर्वीसारखी मागणी किंवा खप नाही. तसेच अलिकडे घरामधील असलेला पाटा हा कपडे धुण्यासाठी वापरत असल्याचे दिसून येते. आधुनिक उपकरणे बाजारात आल्यामुळे या व्यवसायाला उतरती कळा लागल्याचे दिसून येते.

## ५. १० कंत्राटदाराच्या हाताखाली मजूर :

प्रस्तुत नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना कंत्राटदाराच्या हाताखाली मजूर म्हणून कामाला जाता का? असा प्रश्न विचारला होता याविषयी संकलित केलेली माहिती सारणी क्रमांक. ५.१० मध्ये सादर केली आहे.

**सारणी क्रमांक. ५.१०**

**कंत्राटदाराच्या हाताखालील मजूर यानुसार केलेले वर्गीकरण**

| कंत्राटदाराच्या हाताखालील मजुर | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३६ | ३६.0 |
| नाही | ४६ | ४६.0 |
| लागू होत नाही | १८ | १८.0 |
| **एकूण** | **१००** | **१००.0** |

सारणी क्र.५.१० मध्ये दिलेल्या आकडेवारीरून असे दिसून येते की, सर्वाधिक (४६.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी (३६.0%) उत्तरदाते कंत्राटदाराच्या हाताखाली मजूर म्हणून कामाला जात असल्याचे दिसून येतात. तर (१८.0%) उत्तरदाते कंत्राटदारांच्या हाताखाली मजूर म्हणून कामाला जात नसल्याचे दिसून येतात.

## ५.११ रोजची मजूरी :

श्री.पी.एच.स्ट्रेटॉफ यांच्या मते "मजुरी म्हणजे उपयोगितांची निर्मिती करणाऱ्या श्रमाबद्दल कामगाराला प्राप्त होणारा मोबदला होय". कामगाराला मिळणारे उत्पन्न, त्यांचे जीवनमान, समाजातील दर्जा आणि आर्थिक कल्याण ह्या सर्व गोष्टी प्रामुख्याने त्यांना मिळणाऱ्या मजुरीवर अवलंबून असतात. म्हणूनच मजूरीला महत्त्व प्राप्त झाले आहे. उत्तरदात्यांना मिळणाऱ्या मजूरीचे वर्गीकरण सारणी क्रमांक.५.११ मध्ये सादर केले आहे.

## सारणी क्रमांक ५.११

### उत्तरदात्यांच्या रोजच्या मजूरीनुसार केलेले वर्गीकरण

| रोजची मजूरी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रू. ८० ते १०० /- | ४ | ४.0 |
| रू. १०१ ते १३० /- | ६ | ६.0 |
| रू. १३१ ते २०० /- | २६ | २६.0 |
| लागू होत नाही | ६४ | ६४.0 |
| **एकूण** | **१००** | **१००.0** |

सारणी क्रमांक.५.११ मधील माहितीवरून बहुतांशी (६४.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी रू. १३१ ते २०० पर्यंत मजूरी असलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण (२६.0%) असल्याचे दिसून येते. तर रू. १०१ ते १३० पर्यंत मजूरी असलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण (६.0%) असल्याचे आढळून येते. सर्वात कमी रू. ८० ते १०० पर्यंत मजूरी असलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण (४.0%) दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असा निष्कर्ष काढता येईल की, उत्तरदाते गवंडी काम, बिगारी काम (गवड्यांच्या हाताखाली) खुदाई काम, खडी फोडण्याचे, खणीमध्ये दगड फोडण्याचे अशा वेगवेगळ्या कामांमध्ये उत्तरदाते गुंतलेले असल्यामुळे मजूरी वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येते. परंतु स्त्री-पुरूष लिंगभेदानुसार पुरूष वर्गाला मजुरी थोड्या प्रमाणात जास्त असल्याचे दिसून येते. तर स्त्री वर्गाला बिगारी काम, खडी फोडणे या स्वरूपाच्या कामाला पुरूष वर्गापेक्षा कमी म्हणजे रू ८० ते १०० पर्यंत मजूरी देत असल्याचे दिसून येते. कारण उत्तरदात्यांना विचारले असता, स्त्री कामागार पुरूष कामगारांइतके शारिरीक श्रम करू शकत नाही असे सांगितले जाते.

**५.१२ कामाचे तास :**

उत्तरदात्यांच्या कामाच्या तासानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ५.१२ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्र. ५.१२**

**उत्तरदात्यांच्या कामाच्या तासानुसार केलेले वर्गीकरण**

| कामाचे तास | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| ८ तास | ४0 | ४0.0 |
| ६ तासापेक्षा कमी | २४ | २४.0 |
| निश्चित वेळ सांगता येत नाही | ३६ | ३६.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्र.५.१२ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (४0.0%) उत्तरदात्यांचे कामाचे तास ८ दिसून येतात. त्याखालोखाल कामाची निश्चित वेळ सांगता येत नाही अशा उत्तरदात्यांचे प्रमाण (३६.0%) असल्याचे निदर्शनास येते. तर उर्वरित (२४.0%) उत्तरदात्यांचे कामाचे तास ६ तासापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, वडार समाजातील लोक मोठ्या प्रमाणात पारंपरिक व्यवसायाशी संबंधित कामामध्ये गुंतलेले असले तरी काहीजण जाते-पाटा-वरवंटा घडविण्याचे किंवा खुदाई काम, खाणीमध्ये दगड फोडण्याचे, ठेकेदार, गवंडी काम, मजूरी, खडी फोडण्याचे तसेच स्त्रिया उच्चभ्रू वस्तीत धुणी-भांडी आचाऱ्याच्या हाताखाली स्वयंपाक काम, शासकीय, खाजगी नोकरीमध्ये यामध्ये उत्तरदाते वेगवेगळ्या कामामध्ये असल्यामुळे कामाचे तास वेगवेगळे असल्याचे दिसून येते.

## ५.१३ कंत्राटदाराकडून / मालकाकडून वागणूक :

प्रस्तुत नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना कंत्राटदाराकडून / मालकाकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळते? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ५.१३ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्र. ५.१३**

**कंत्राटदाराकडून / मालकाकडून वागणूक यानुसार केलेले वर्गीकरण**

| कंत्राटदाराकडून / मालकाकडून मिळणारी वागणूक | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| चांगली | १५ | १५.0 |
| मध्यम | ३४ | ३४.0 |
| वाईट | ६ | ६.0 |
| लागू होत नाही | ४५ | ४५.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्र. ५.१३ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (४५.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी (३४.0%) उत्तरदात्यांना कंत्राटदाराकडून मध्यम प्रकारची वागणूक मिळते असे दिसून येते. त्या खालोखाल (१५.0%) उत्तरदात्यांना चांगल्या प्रकारची, उर्वरित (६.0%) उत्तरदात्यांना वाईट प्रकारची वागणूक मिळत असल्याचे दिसून येते.

## ५.१४ आठवड्याची सुट्टी :

उत्तरदात्यांच्या आठवड्याची सुट्टीनुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ५.१४ मध्ये दर्शविले आहे.

सारणी क्र. ५.१४

आठवड्याची सुट्टी यानुसार केलेले वर्गीकरण

| आठवड्याची | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५९ | ५९.0 |
| नाही | २३ | २३.0 |
| लागू होत नाही | १८ | १८.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्र. ५.१४ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (५९.0%) उत्तरदात्यांना आठवड्याची सुट्टी असते, असे दिसून येते. तर त्याखालोखाल (२३.0%) उत्तरदात्यांना आठवड्याची सुट्टी नसल्याचे दिसून येत. उर्वरित (१८.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही.

## ५. १५ काम उपलब्ध नसल्यास :

नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना जेव्हा काम उपलब्ध नसते त्यावेळी काय केले जाते? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, बहुसंख्य (५९.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी (२५.0%) उत्तरदाते जेव्हा काम उपलब्ध नसते, त्यावेळी त्यांना बेकार राहावे लागते. कारण त्यांना आपल्या पारंपरिक व्यवसायाशिवाय इतर कोणतेही काम येत नसल्याने पावसाळ्यामध्ये खुदाई काम, खडी फोडण्याचे खाणीमधील काम बंद असल्याने त्यांना बेकार राहावे लागत असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत त्यांच्या स्त्रिया धुणी-भांडी आचाऱ्याच्या हाताखाली स्वयंपाक काम करतात यावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असल्याचे दिसून येते. तर (१६.0%) उत्तरदाते जेव्हा काम उपलब्ध नसते त्यावेळी मिळेल ते काम करण्याची त्यांची तयारी असते असे दिसून येते. उदा. शेतमजूर, प्लबिंग काम, मिळेल ते मजूरी काम इ.

### ५. १६ नवीन मशिनरीचा परिणाम :

नमुन्यांमध्ये निवडलेल्या १00 उत्तरदात्यांना पारंपरिक व्यवसायामध्ये ननिव (आधुनिक) मशिनरी आल्या आहेत याविषयीचे मत विचारण्यात आले होते. उत्तरदात्यांच्या माहितीवरून स्पष्ट होते की, बहुतांशी उत्तरदात्यांच्या मते पूर्वी खाणीतून दगड फोडण्याचे कौशल्य व अंगमेहनत फक्त वडार जमात करत असे. परंतु अलीकडे या पारंपरिक व्यवसायामध्ये नवीन मशिनरी क्रशर मशीनच्या सहाय्याने खडी फोडली जाते. तसेच दारूबत्ती, ब्लास्टींग व बारच्या सहाय्याने दगड फोडले जात असल्यामुळे वडार जमातीचा पारंपरिक व्यवसाय बुडत चालल्याचे दिसून येते. पैशाच्या जोरावर व यंत्राच्या सहाय्याने कोणत्याही समाजातील मजूर या व्यवसायाला सहज उपलब्ध होऊ लागल्याने वडार जमातींमधील लोकांच्यापुढे उदनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो.

### ५. १७ कामाबद्दल समाधान :

नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुमच्या सध्याच्या कामावद्दल कितपत समाधानी आहात? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीनुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ५.१७ मध्ये दर्शविली आहे.

सारणी क्रमांक ५.१७

**उत्तरदात्यांचा कामाबद्दल समाधान यानुसार केलेले वर्गीकरण**

| कामाबद्दल समाधान | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| पूर्ण समाधान | २२ | २२.0 |
| अंशत: समाधानी | ५0 | ५0.0 |
| असमाधानी | २८ | २८.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.५.१७ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, निम्मे (५0.0%) उत्तरदाते सध्याच्या कामाबद्दल अंशत: समाधानी असल्याचे निदर्शनास येते. तर

त्याखालोखाल (२८.0%) उत्तरदाते असमाधानी असल्याचे दिसून येतात. उर्वरित (२२.0%) उत्तरदाते पूर्ण समाधानी असल्याचे दिसून येतात.

पूर्वी गावगाड्याबाहेर राहून जाते-पाटा-वरवंटा किंवा दगड फोडण्याचा हक्काचा व्यवसाय वडार जमातीचा होता. परंतु अलीकडच्या काळात आधुनिक उपकरणांमुळे, मशिनरीमुळे मूळच्या पारंपरिक व्यवसायामध्ये बदल झालेला दिसून येतो. या व्यवसायामध्ये फारसा फायदा उरला नसल्याने आज उत्तरदाते या व्यवसायात समाधानी नसल्याचे आढळून येतात.

## ५.१८ कौटुंबिक गरजांची पूर्तता :

उत्तरदात्यांच्या कौटुंबिक गरजेच्या पूर्ततेनुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ५.१८ मध्ये दर्शविले आहे.

सारणी क्रमांक ५.१८
कौटुंबिक गरजांची पूर्तता यानुसार केलेले वर्गीकरण

| कौटुंबिक गरजांच्या पूर्तता | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| भागतात | १५ | १५.0 |
| बऱ्या प्रमाणात | २७ | २७.0 |
| काही प्रमाणात | ३३ | ३३.0 |
| नाही | २५ | २५.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्र.५.१८ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (३३.0%) उत्तरदात्यांच्या व्यवसायातून काही प्रमाणात कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागत असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल (२७.0%) उत्तरदात्यांच्या बऱ्या प्रमाणात तर (२५.0%) उत्तरदात्यांच्या आवश्यक गरजा भागत नसल्याचे दिसून येते. उर्वरित (१५.0%) उत्तरदात्यांच्या कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागत असल्याचे दिसून येते.

## ५.१९ सामाजिक आर्थिक दर्जा :

प्रस्तुत नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना व्यवसायामुळे समाजातील सामाजिक आर्थिक दर्जा सुधारला आहे का? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ५.१९ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक.५.१९**

**उत्तरदात्यांचा सामाजिक-आर्थिक दर्जा यानुसार केलेले वर्गीकरण**

| सामाजिक-आर्थिक दर्जातील सुधारणा | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४५ | ४५.0 |
| नाही | ३0 | ३0.0 |
| निश्चित सांगता येत नाही | २५ | २५.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्र.५.१९ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (४५.0%) उत्तरदात्यांच्या सामाजिक-आर्थिक दर्जामध्ये सुधारणा झाल्याचे दिसून येते. त्याखालोखाल (३0.0%) उत्तरदात्यांच्या सामाजिक-आर्थिक दर्जामध्ये सुधारणा झालेली नसल्याचे आढळून येते. तर उर्वरित (२५.0%) उत्तरदात्यांना सामाजिक-आर्थिक दर्जात्मक सुधारणाविषयी निश्चित सांगता आले नाही.

वरील सारणीवरून आपणाला असे अनुमान काढता येईल की, सर्वाधिक उत्तरदात्यांच्या सामाजिक-आर्थिक दर्जामध्ये सुधारणा झाल्याचे दिसून येते. कारण अलिकडच्या काळात वडार समाज काही प्रमाणात स्थिरावलेला दिसून येतो. स्थिरावलेले लोक आपल्या पारंपरिक व्यवसायाबरोबर इतर व्यवसाय करण्यात गुंतलेले दिसून येतात.

## ब. विभाग दुसरा

### कामगारांच्या समस्या :

प्रस्तुत विभागामध्ये १00 उत्तरदात्यांच्या मुलाखती अनुसूचीद्वारे मुलाखती घेऊन उत्तरदात्यांच्या व्यावसायिक समस्या, व्यवसायामुळे आरोग्यावर होत असलेला परिणाम, व्यसन, व्यसनावरील खर्च, कंत्राटदाराकडून देण्यात येणारी मजूरी पुरेशी आहे की नाही, अपुरी मजूरी वाटण्याची कारणे, नुकसान भरपाई, शासनाच्या योजना, पारंपरिक व्यवसायाशिवाय नवीन स्विकारलेला व्यवसाय इ. माहिती संकलित करून त्याविषयीचे विश्लेषण केले आहे.

### ५.२०. व्यवसाय समस्या :

प्रस्तुत नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुम्ही जो व्यवसाय करता त्यामध्ये काही समस्या जाणवतात का? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांच्याकडून संकलित केलेल्या माहितीच्या आधारे पुढीलप्रमाणे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.२० मध्ये सादर केले आहे.

**सारणी क्र.५.२०**

व्यवसाय समस्या यानुसार केलेले वर्गीकरण

| उत्तरांचा प्रवर्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ५७ | ५७.0 |
| नाही | ४३ | ४३.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्र.५.२० मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांश (५७.0%) उत्तरदात्यांना व्यावसायिक समस्या जाणवत असल्याचे दिसून येते. तर उर्वरित (४३.0%) उत्तरदात्यांना कोणत्याही स्वरूपाच्या व्यावसायिक समस्या जाणवत नसल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असा निष्कर्ष काढता येईल की, बहुतांशी उत्तरदात्यांना व्यावसायिक समस्या जाणवतात. कारण जाते-पाटा-वरवंटा हद्दपार झाला आहे. तसेच हा व्यवसाय उच्चभ्रू मंडळी व धनिकांच्या हाती गेल्या असल्यामुळे पैशाच्या जोरावर व यंत्राच्या सहाय्याने कोणत्याही समाजातील मजूर या व्यवसायाला सहज उपलब्ध होऊ लागल्याने वडार जमातीचा पारंपरिक व्यवसाय बुडत चालला असल्याचे चित्र दिसत आहे. या व्यवसायाला आधुनिक स्वरूप प्राप्त झाले आहे. नवीन यंत्रसामुग्री शिवाय हा व्यवसाय करणे आज कठीण झाले आहे. ही महागडी यांत्रिक साधने घेण्याची कुवत या जमातीकडील सर्व लोकांच्याकडे दिसत नाही. अशा वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या दिसून येतात.

## ५.२१ कामामुळे आरोग्यावर परिणाम :

व्यवसायाचे स्वरूप आणि त्यासाठी आवश्यक असणारे श्रम तसेच व्यवसायाच्या ठिकाणी असणारे वातावरण यांचा कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होतो का हे जाणून घेण्यासाठी माहिती संकलित केली होती. संकलित केलेल्या माहितीच्या आधारे सारणी क्रमांक.५.२१ मध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे.

सारणी क्रमांक.५.२१

कामामुळे आरोग्यावर परिणाम यानुसार केलेले वर्गीकरण

| उत्तरांचा प्रवर्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ८० | ८०.० |
| नाही | २० | २०.० |
| **एकूण** | **१००** | **१००.०** |

सारणी क्र.५.२१ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (८०.०%) उत्तरदात्यांना कामामुळे आरोग्यावर परिणाम होत असल्याचे दिसून येते. तर उर्वरित (२०.०%) उत्तरदात्यांना कोणत्याही प्रकारचा आरोग्यावर परिणाम होत नसल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की, बहुतांशी (८0.0%) उत्तरदात्यांच्या व्यवसायामुळे किंवा कामामुळे हातदुखी, पाठदुखी, मानेचा त्रास डोळ्यांचा त्रास या स्वरूपामध्ये परिणाम झालेला दिसून येतो.

## ५.२२ व्यसन :

शारिरीक ताण कमी करण्यासाठी वडार समाजातील लोक दारू अथवा अन्य व्यसनाचा आधार घेतात. या अनुषंगाने वडार समाजातील व्यसनाधीनतेची समस्या समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. पुढीलप्रमाणे सारणी क्रमांक ५.२२ मध्ये सादर केले आहे.

**सारणी क्र.५.२२**

**उत्तरदात्यांच्या व्यसनानुसार केलेले वर्गीकरण**

| व्यसन | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| दारू + तंबाखू | २५ | २५.0 |
| दारू+तंबाखू+बिडी+जुगार | १४ | १४.0 |
| दारू | २२ | २२.0 |
| पानसुपारी+तंबाखू | १२ | १२.0 |
| गुटखा + दारू | ९ | ९.0 |
| लागू होत नाही | १८ | १८.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्र.५.२२ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, केवळ (१८.0%) उत्तरदाते वगळता अन्य सर्व (८२.0%) उत्तरदात्यांना कोणते ना कोणते व्यसन आहे. बहुतांश (२५.0%) उत्तरदात्यांना दारू व तंबाखूचे व्यसन आहे. त्याखालोखाल (२२.0%) उत्तरदात्यांना दारूचे, (१४.0%) उत्तरदात्यांना दारू किंवा तंबाखू, बिडी व जुगार याचे व्यसन आहे, (१२.0%) उत्तरदात्यांना पानसुपारी व तंबाखू खाण्याचे, तर (९.0%) लोकांना दारू व गुटखा खाण्याचे व्यसन दिसून येते.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की, बहुतांशी (२५.0%) उत्तरदात्यांना दारू व तंबाखूचे व्यसन आहे, या व्यसनाबरोबरच इतरही अनेक व्यसने असलेली दिसून येतात.

## ५.२३ व्यसनावर होणारा खर्च :

उत्तरदात्यांना त्यांच्या व्यसनावर होणारा मासिक खर्च जाणून घेण्यासाठी माहिती संकलित केली होती. संकलित केलेल्या माहितीच्या आधारे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.२३ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ५.२३**

**व्यसनावर होणारा मासिक खर्च यानुसार केलेले वर्गीकरण**

| व्यसनावर होणारा होणारा मासिक खर्च | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रू.१00 ते ३00 /- | ८ | ८.0 |
| रू.३0१ ते ५00 /- | १५ | १५.0 |
| रू.५0१ ते १000 /- | २0 | २0.0 |
| रू.१00१ ते त्याहून अधिक | २६ | २६.0 |
| सांगता येत नाही | १३ | १३.0 |
| लागू होत नाही | १८ | १८.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.५.२३ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (२६.0%) उत्तरदात्यांचा व्यसनावरील मासिक खर्च रू. १00१ ते त्याहून अधिक असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल (२0.0%) उत्तरदात्यांचा व्यसनावरील खर्च रू.५0१ ते १000 पर्यंत, तर उर्वरित अनुक्रमे (१५.0%) उत्तरदात्यांचा व्यसनावरील खर्च रू. ३0१ ते ५00, (१३.0%) उत्तरदात्यांना खर्च सांगता येत नसल्याचे दिसून येते. (८.0%) उत्तरदात्यांचा

व्यसनावरील खर्च रू.१00 ते ३00 पर्यंत असल्याचे दिसून येते. (१८.0%) उत्तरदात्यांना कोणत्याही स्वरूपाचे व्यसन नसल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असा अनुमान काढता येईल की, वडार समाजातील लोकांची आर्थिक परिस्थिती बेताची असून देखील व्यसनावर खर्च हा लक्षणीय दिसून येतो.

## ५.२४ कंत्राटदाराकडून देण्यात येणारी मजूरी :

व्यक्तीचा आर्थिक स्तर वाढला की, सामाजिक स्तर वाढतो. या सर्व बाबींना मजूरी किंवा वेतन ही बाब कारणीभूत असल्याने उत्तरदात्यांना कंत्राटदाराकडून / मालकाकडून देण्यात येणारी मजूरी पुरेशी वाटते का? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ५.२४ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ५.२४**

कंत्राटदाराकडून देण्यात येणारी मजूरी यानुसार केलेले वर्गीकरण

| उत्तरांचा प्रवर्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २८ | २८.0 |
| नाही | ३५ | ३५.0 |
| लागू होत नाही | ३७ | ३७.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ५.२४ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (३७.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी (३५.0%) उत्तरदात्यांना कंत्राटदाराकडून किंवा मालकाकडून देण्यात येणारी मजूरी अपुरी असल्याचे दिसून येते. तर (२८.0%) उत्तरदात्यांना मजूरी पुरेशी असल्याचे वाटते.



SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## ५.२५ अपुरी मजूरी वाटण्याची कारणे :

नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना अपुरी मजूरी वाटण्याची कारणे विचारली असता, उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, ३५.0% उत्तरदात्यांना अपुरी मजूरी वाटते. कारण अंगमेहनत व शारिरीक कष्ट या तुलनेत न परवडणारी मजूरी. आजच्या महागाईच्या तुलनेत या व्यवसायातून कुटुंबाचा उदरनिर्वाह होऊ शकत नसल्याचे दिसून येते.

## ५.२६ अपघात नुकसान भरपाई :

प्रस्तुत नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना कंत्राटदाराकडून / मालकाकडून काम करताना अपघात झाल्यावेळी नुकसान भरपाई दिली जाते का? याविषयी माहिती संकलित केली होती. संकलित केलेल्या माहितीच्या आधारे पुढीलप्रमाणे वर्गीकरण सारणी क्रमांक.५.२६ मध्ये सादर केले आहे.

**सारणी क्रमांक.५.२६**

अपघात नुकसान भरपाई यानुसार केलेले वर्गीकरण

| उत्तरांचा प्रवर्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २६ | २६.0 |
| नाही | ३७ | ३७.0 |
| लागू होत नाही | ३७ | ३७.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ५.२६ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (३७.0%) उत्तरदात्यांना कंत्राटदाराकडून किंवा मालकाकडून कामाच्या ठिकाणी अपघात झाला असल्यास नुकसान भरपाई दिली जात नसल्याचे दिसून येते. तर उर्वरित (२६.0%) उत्तरदात्यांना नुकसान भरपाई दिली जाते.परंतु त्याचे स्वरूप थोड्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. (३७.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही.

## ५.२७ शासकीय योजना :

समाज घटकाला किमान संरक्षण देण्यासाठी श्री. रविंद्र वर्मा यांच्या 'दुसरा कामगार आयोग २000' यांनी 'छत्री कायद्याची' शिफारस १0६ उद्योगांच्या कामगारांसाठी केली. परंतु नंतरच्या सत्तांतरामुळे नव्या सरकारने 'नॅशनल कमिशन फॉर इंटरप्राईज इन द-अन-ऑर्गनाइज्ड सेक्टर' हे नवे कमिशन प्रा. अर्जुन सेनागुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली सप्टे २00४ मध्ये नेमून या समितीने असंघटीत कामगारांसाठी 'सामाजिक सुरक्षा विधेयक' २00६ मध्ये केंद्र सरकारला सादर केले. या विधेयकात कामगारांसाठी, कुटुंबासाठी आरोग्य, विमा, रूग्णालय खर्चाची भरपाई, महिला कामगारांसाठी बाळंतपण खर्चाची भरपाई, आजारपणाच्या काळातील बुडालेल्या मजुरीची भरपाई, अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू विमा, दारिद्र्यरेषेखालील ६0 वर्षापुढील कामगाराला निवृत्ती वेतन, कामगारांसाठी प्रॉव्हिडंट फंड, यासारख्या अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. (ठिणगी वार्ता २00७, सामाजिक सुरक्षा कायदा पृ.१२) त्या योजनाविषयी उत्तरदात्यांना माहिती आहे अथवा नाही हे अजमावण्याच्या दृष्टीने केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक मध्ये दर्शविले आहे.

सारणी क्रमांक ५.२७

शासकीय योजना यानुसार केलेले वर्गीकरण

| उत्तरांचा प्रवर्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १७ | १७.0 |
| नाही | ८३ | ८३.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ५.२६ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (८३.0%) उत्तरदाते शासनाच्या योजना माहिती नसल्याचे सांगतात. तर उर्वरित (१७.0%) उत्तरदात्यांना शासनाच्या योजना माहिती असल्याचे दिसून येते. पण योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे सांगितले.

वरील सारणीवरून असे अनुमान काढता येईल की, बहुतांशी (८३.0%) उत्तरदात्यांना शासनाच्या योजना माहित नसल्याचे दिसून येते. योजना, सवलती या मोठ्या प्रमाणात राबवूनसुद्धा त्या त्यांच्यामार्फत पोहचत नसल्याचे स्पष्ट होत आहे.

## ५.२८ नवीन स्विकारलेला व्यवसाय :

उत्तरदात्यांनी पारंपरिक व्यवसायाशिवाय नवीन स्विकारलेल्या व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ५.२८ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक.५.२८**

**नवीन स्विकारलेला व्यवसाय यानुसार केलेले वर्गीकरण**

| नवीन स्विकारलेला व्यवसाय | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| शासकीय-निमशासकीय नोकरी | ११ | ११.0 |
| उद्योगधंदा | १ | १.0 |
| व्यापार (किराणा माल दुकान) | ५ | ५.0 |
| शेती | २ | २.0 |
| धुणी-भांडी (स्त्रिया) | १४ | १४.0 |
| इतर | १२ | १२.0 |
| लागू होत नाही | ५५ | ५५.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ५.२८ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, वहुतांशी (५५.0%) उत्तरदात्यांनी पारंपरिक व्यवसायाशिवाय नवीन व्यवसाय स्विकारलेला नसल्याचे दिसून येते. उर्वरित उत्तरदात्यांपैकी (१४.0%) उत्तरदाते धुणी-भांडी (स्त्रिया) करत असल्याचे दिसून येतात. त्याखालोखाल (१२.0%) उत्तरदात्यांनी इतर व्यवसाय स्विकारलेला आहे. यामध्ये (टेलर काम, ड्रायव्हर काम, आचाऱ्याच्या हाताखाली, देवऋषी, स्वत:ची वडा-पाव गाडी इ.) तर उर्वरित अनुक्रमे (११.0%) उत्तरदात्यांनी शासकीय-खाजगी नोकरीमध्ये प्रवेश

केला आहे. (५.0%) उत्तरदात्यांनी किराणा माल दुकान घातल्याचे दिसून येते. (२.0%) उत्तरदात्यांनी शेतो, (१.0%) उत्तरदात्यांनी स्वत:चा उद्योगधंदा उभा केल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, बहुसंख्य उत्तरदात्यांच्यावर आधुनिकीकरणाचा परिणाम झालेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना पारंपरिक व्यवसाय तसेच बांधकाम क्षेत्राशी संबंधित व्यवसाय करण्यामध्ये गुंतलेले असल्याचे दिसून येते. उर्वरित उत्तरदात्यांच्यावर आधुनिकीकरणाचा तसेच बदलत्या काळाचा परिणाम झालेल्या असल्यामुळे उत्तरदात्यांनी वेगवेगळ्या नवीन व्यवसायांचा स्विकार केलेला दिसून येतो.

यानंतर पुढील सहाव्या प्रकरणामध्ये ठळक निष्कर्ष आणि सूचना मांडण्यात आले आहेत.